जा.क्र.उमाशि-१/पुवि/ऑन/प्रवेश/२०१५-१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय. 2028
दिनांक :
1 4 MAY 2015

प्रति,

प्राचार्य,

सर्व अल्पसंख्यांक उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र.

विषय :- इ.११ वी प्रवेश प्रक्रिया सुधारणा मोहिम ...

संदर्भ : शासन पत्र क्र.प्रवेश-२०१४/प्र.क्र.१९२/एसडी-२ दि.१४.०५.२०१५

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सन २०१५-१६ मधील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे इ.११ वीचे प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत हे आपणास विदित आहेच. माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयांना इन हाऊस कोटयातून २० टक्के प्रवेश, संस्था व्यवस्थापनास ५ टक्के प्रवेश, अल्पसंख्यांक संस्थांसाठी ५० टक्के प्रवेश करण्याबाबत अधिकार आहेत.

सदर प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत झालेल्या मागणीनुसार या कार्यालयाने शासनास कळविलेनुसार मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील संदर्भीय पत्रान्वये अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत अल्पसंख्यांक संस्थांनी त्यांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी व प्रवेश द्यावा जेणेकरून विद्यार्थ्यांची सोय होईल असे शासन आदेशान्वये कळविले आहे.

याबाबत कळविण्यात येते की संदर्भीय शासन पत्रानुसार अल्पसंख्यांक संस्था संचलित उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्यास्तरावर अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवावी व शासनाच्या प्रचलित नियमांनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. याबाबत या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार येऊ नये याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत या कार्यालयाकडे तक्रार आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली व संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ तथा
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : प्रवेश-२०१४/प्र.क्र.१९२/एसडी-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ मे, २०१५.

प्रति,

शिक्षण आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

**विषय :-** इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुधारणा मोहिम.
**संदर्भ :-** आपले पत्र क्र. उच्च माध्य.-२४२ अ/ऑनलाईन प्रवेश/१५/१९६७, दि. १७ एप्रिल, २०१५.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई व पुणे यांनी इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतच्या अभिप्रायाची धारणा पक्की करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तथापि, संदर्भाधीन पत्रातील मुद्दा क्र. ९ अल्पसंख्यांक कोट्यातील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करणे याबाबत अल्पसंख्यांक संस्थांनी त्यांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी व प्रवेश द्यावा जेणेकरुन विद्यार्थ्यांची सोय होईल, असे शासनाचे आदेश आहेत.

(अ. पां. वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner